# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO ९००१:२०१५) (ISO/IEC २७००१:२०१३)

शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४ था मजला, ४९, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१

दू.क्र.: ०२२-६२५४२१००/१८८/१९०

संकेतस्थळ : www.msbte.org.in ई-मेल : Secretary@msbte.com


जा.क्र. मरातंशिमं/का-४०/लले/उ.प.२०/२०२०/ 087 दि. - 9 NOV 2020

**महत्वाचे परिपत्रक**

प्रति,

प्राचार्य,

मंडळाशी संलग्नीत सर्व संस्था.

**विषय :- अंतीम सत्र/वर्ष वगळुन उर्वरीत सर्व विद्यार्थ्यांची बॅकलॉग विषयाच्या उन्हाळी २०२० परीक्षेच्या आयोजनाबाबत.**

संदर्भ :- १. मंडळाचे महत्वाचे परिपत्रक जा.क्र.मरातंशिमं/का-२०/परीक्षा२०२०/८३ दि. १५.०५.२०२०.

२.मंडळाचे परिपत्रक जा.क्र.मरातंशिमं/का-४०/लले/उ.प.२०/२०२०/०४१ दि.२१.०९.२०२०.

महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाशी संलग्नीत पदविका अभ्यासक्रमाच्या परीक्षेचे नियोजन व शैक्षणिक वेळापत्रकाबाबतच्या ठळक बाबी सर्व संस्थांना, विद्यार्थी व पालकांना उपरोक्त संदर्भ क्र. ०१ च्या परिपत्रकान्वये कळविण्यात आल्या होत्या. संदर्भ क्र. ०१ च्या परिपत्रकामधील मुद्दा क्र. ०४ नुसार अंतीम सत्र / वर्षातील विद्यार्थी वगळुन नियमीत विद्यार्थ्यांचा उन्हाळी परीक्षा २०२० चा निकाल दि. १४.०७.२०२० रोजी जाहीर करण्यात आला आहे तसेच मुद्दा क्र. ०५ नुसार मंडळाच्या परीक्षाविषयक नियमावलीतील RG4C नुसार पुढील सत्र/वर्ष प्रवेशासाठी पात्र नसलेल्या विद्यार्थ्यांना कॅरीफॉरवर्ड योजनेतंर्गत शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ करिता प्रवेशासाठी पात्रता देण्यात आली आहे. द्वितीय, तृतीय वर्षात प्रवेशित तसेच कॅरीफॉरवर्ड योजने अंतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांची बॅकलॉग विषयांची उन्हाळी परीक्षा २०२० ( उदा. तृतीय सत्रात प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रथम व द्वितीय सत्रातील बॅकलॉग विषय व पाचव्या सत्रात प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांचे चौथे, तिसरे, दुसरे व प्रथम सत्रातील बॅकलॉग विषय ) शैक्षणिक वर्ष २०२०-२१ चे विषम सत्र संपण्यापुर्वी संस्थास्तरावर घेण्यात येईल असे कळविण्यात आले होते. तसेच सदर बाब मंडळाच्या संदर्भ पत्र क्र. ०२ च्या परिपत्रकान्वये पुनश्च संस्थांना कळविण्यात आली होती.

तसेच अंतीम सत्र/वर्षातील विद्यार्थी व त्यांचे असलेले बॅकलॉग विषयांची परीक्षा मंडळाने घेतली असुन सदर विद्यार्थ्यांचा निकाल दि.०३.११.२०२० रोजी जाहीर करण्यात आला आहे. आता अंतीम सत्र/वर्ष वगळुन उर्वरीत विद्यार्थ्यांची खालील नमुद केलेल्या तक्त्यातील सत्र/वर्षातील बॅकलॉग विषयांची परीक्षा संस्थास्तरावर आयोजीत करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रम | अभ्यासक्रमाचा कालावधी | अंतीम सत्र/वर्ष वगळुन उर्वरीत सर्व विद्यार्थ्यांचे बॅकलॉग विषयांचे सत्र/वर्ष |
|---|---|---|---|
| ०१. | AICTE | ०६ सत्र | सत्र १,२,३,४ |
| ०२. | AICTE | ०८ सत्र | सत्र १,२,३,४,५,६. |
| ०३. | AICTE | ०२ वर्ष | वर्ष १. |
| ०४. | AICTE | ०३ वर्ष | वर्ष १,२. |
| ०५. | Non-AICTE | ०२ वर्ष | वर्ष १. |
| ०६. | Non-AICTE | ०३ वर्ष | वर्ष १,२. |
| ०७. | Non-AICTE | ०३ सत्र | सत्र १,२. |
| ०८. | Non-AICTE | ०४ सत्र | सत्र १,२. |

उपरोक्त परीक्षार्थी विद्यार्थ्यांची यादी अभ्यासक्रम निहाय व पेपरकोडनुसार Institute Login मध्ये उपलब्ध करुन देण्यात येईल.

**सदर संस्थास्तरावरील बॅकलॉग विषयांच्या परीक्षेबाबतची कार्यपध्दती खालीलप्रमाणे राहील.**

१. अंतीम सत्र/वर्ष वगळुन उर्वरीत विद्यार्थ्यांच्या बॅकलॉग विषयांच्या परीक्षेचे वेळापत्रक

| अ.क्र. | परिक्षा | कालावधी |
|---|---|---|
| ०१. | Institute Level Non Theory and Theory Examination. | दि.२३.११.२०२० ते दि.०५.१२.२०२०. |

वरील नमुद कालावधीत संस्थांनी प्राधान्याने प्रात्यक्षिक परीक्षा थेरी परीक्षेपुर्वी घेण्याचे नियोजन करावे.

२. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद मान्यताप्राप्त (अभियांत्रिकी व औषधनिर्माण) तसेच शासन मान्यताप्राप्त अल्पमुदतीच्या अभ्यासक्रमातील अंतीम सत्र/वर्ष वगळुन उर्वरीत सर्व विद्यार्थ्यांची बॅकलॉग विषयाच्या प्रात्यक्षिक परीक्षा ऑनलाईन प्रणालीचा वापर करुन तोंडी पध्दतीने संस्थास्तरावर घेण्यात यावी. याकरिता विविध मिटींग ॲप्लिकेशनचा वापर करुन प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात यावी. शक्य नसल्यास टेलीफोनिक पध्दतीने सदर प्रात्यक्षिक परीक्षा संस्थास्तरावर घेण्यात यावी. वरील सर्व प्रयत्नांनंतरही विद्यार्थ्यांची प्रात्यक्षिक परीक्षा घेणे शक्य नसल्यास अशा विद्यार्थ्यांचे सत्रकर्म, जर्नल्स, निरंतर मुल्यमापन या अधारावर मुल्यमापन करुन गुण देण्यात यावेत.

३. संस्था स्तरावरील लेखी परीक्षा विद्यार्थी प्रवेशीत असलेल्या संस्थेमार्फत घेण्यात याव्यात याकरिता सर्व संस्थांना परीक्षा केंद्र म्हणुन घोषीत करण्यात आले आहे.

४. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद मान्यताप्राप्त (अभियांत्रिकी व औषधनिर्माण) अभ्यासक्रमातील तसेच शासन मान्यताप्राप्त अल्पमुदतीच्या अभ्यासक्रमातील अंतीम सत्र/वर्ष वगळुन उर्वरीत सर्व विद्यार्थ्यांची बॅकलॉग विषयाच्या लेखी परीक्षा Multiple Choice Question (MCQ) वापरुन ऑनलाईन पध्दतीने संस्थास्तरावरुन घेण्यात येईल. सदर परीक्षा विद्यार्थी Smart Mobile Phone/Laptop/Tablet/Desktop इत्यादीचा वापर करुन सद्यपरिस्थीत ज्याठिकाणी वास्तव्यास आहेत त्याठिकाणाहुन देवु शकतील. सदर परीक्षेत विद्यार्थ्यांना ४० पैकी ३० प्रश्न सोडविणे आवश्यक आहे. प्रत्येक प्रश्न ०१ गुणाचा असेल व सदर परीक्षेचा कालावधी ०१ तासाचा असेल. सदर ४० प्रश्न संपुर्ण अभ्यासक्रमावर आधारीत असतील.

५. ज्या विषयांच्या अभ्यासक्रमात Drawing चा समावेश असल्याने या विषयांची परिक्षा MCQ वापरुन घेणे शक्य नाही अशा विषयांची परीक्षा सत्रकर्म/अभ्यासक्रमावर आधारीत सादरीकरणाद्वारे ऑनलाईन पध्दतीने संस्थास्तरावर घेण्यात यावी. सदर सादरीकरण तसेच तोंडी प्रश्नोत्तरांच्या आधारे परिक्षक मुल्यांकन करतील.

६. संस्थेनी बॅकलॉग विषयांच्या प्रात्यक्षिक व लेखी परीक्षेचे वेळापत्रक तयार करुन विद्यार्थ्यांना अवगत करावे.

७. ज्या विद्यार्थ्यांकडे ऑनलाईन लेखी परीक्षेकरिता इंटरनेट, संगणक, मोबाईल इ. सुविधा उपलब्ध नाहीत अथवा उपलब्ध होऊ शकणार नाहीत अशा विद्यार्थ्यांकरिता शेवटचा पर्याय म्हणुन ऑनलाईन परीक्षा संस्थेमध्ये घेण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात यावी.

८. जे विद्यार्थी अपवादात्मक परिस्थितीत संस्थेत येऊन परीक्षा देतील त्यावेळी संस्था व विद्यार्थ्यांनी कोव्हिड-१९ बाबतच्या केंद्र व राज्यशासनाच्या सर्व मार्गदर्शक सुचनांचे काटेकोर पालन करावे.

९. दिव्यांग विद्यार्थ्यांकरिता नियमानुसार परीक्षेकरिता अधिकचा वेळ देण्यात येईल व संस्थांमार्फत अशा विद्यार्थ्यांना सोयीसुविधा पुरविण्यात याव्यात.

१०. सदर संस्था स्तरावर घेण्यात येणाऱ्या उन्हाळी परीक्षा २०२० चे स्वरुप ऑनलाईन पध्दतीने असल्यामुळे, परीक्षा विषयक नियमावलीतील RG11K नुसार Photocopy/Verification and Reassessment ची सुविधा उन्हाळी परीक्षा २०२० परीक्षेकरिता देण्यात येणार नाही.

सदर परीक्षेबाबतची सविस्तर कार्यप्रणाली व मार्गदर्शक सुचना संस्थांना स्वतंत्रपणे देण्यात येतील. संस्थेच्या प्राचार्यांनी वरील बाबी विद्यार्थी व त्यांचे पालक यांना अवगत कराव्यात व वेळोवेळी विद्यार्थ्यांच्या व पालकांच्या शंकांचे निरसन व मागदर्शन करावे तसेच उपरोक्त बाबीनुसार आवश्यक ती कार्यवाही करावी.

9/11/2020

( डॉ. महेंद्र रा.चितलांगे)
सचिव
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई.

प्रत :- १. प्राचार्य, सर्व स्वायत्त संस्था यांना माहिती व कार्यवाहीकरिता.
२. उपसचिव, मंडळाचे विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नागपुर व औरंगाबाद यांना माहिती व कार्यवाहीकरिता.